| जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड | |
|---|---|
| वेब साईट- https://nanded.gov.in/ | वेब साईट- setu.nanded@maharashtra.gov.in |
| दुरध्वनी क्रमांक-०२४६२-२४५९४६ | दुरध्वनी क्रमांक-०२४६२-२४५९४६ |
| शाखाः- नांदेड जिल्हा सेतू समिती- माहिती व तंत्रज्ञान कक्ष | |

दिनांक १८/०५/२०२६

## आपले सरकार सेवा केंद्र मुलाखत प्रक्रियेबाबत आक्षेप / हरकत सादर करणेबाबत.

जिल्हा सेतू समिती, नांदेड मार्फत जिल्हयातील ग्रामीण भागातील ग्रामपंचायतस्तरावर आपले सरकार सेवा केंद्र बाबत एकुण १२२० उमेदवारांच्या मुलाखतीचे दिनांक १५ व १६ मे २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजन केले होते. तसेच दिनांक १६ मे २०२६ रोजी मुलाखतीचा अंतरिम निकाल https://nanded.gov.in/ जिल्हयाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.

१. मुलाखतीनंतर करण्यात आलेली प्राथमिक निवड ही अंतरिम स्वरूपाची असून, संबंधित अर्जदारांच्या मुळ कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतरच अंतिम निवड करण्यात येईल.
२. प्राथमिक निवड झालेल्या अर्जदारांची मुळ कागदपत्रे तपासणी व पडताळणी पूर्ण झाल्यानंतरच त्यांची निवड निश्चित करण्यात येईल.

तरी, सदर मुलाखत प्रक्रिये बाबीबाबत उमेदवारांना काही आक्षेप / हरकत असल्यास त्यांनी त्याबाबतचा लेखी अर्ज पुराव्यांसह जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे आवक कक्षामध्ये (तळ मजला) दिनांक १९ मे २०२६ ते २२ मे २०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावा.

आक्षेप सादर करताना खालील बाबींची नोंद घ्यावी :

१. आक्षेप लेखी स्वरूपात (नोंदणी क्रमांकासह) असावा.
२. संबंधित पुरावे / कागदपत्रांच्या प्रती जोडणे आवश्यक राहील.
३. अर्जावर उमेदवाराचे नाव, ग्रामपंचायत, मोबाईल क्रमांक व स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.
४. विहित मुदतीनंतर प्राप्त होणारे आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत.

निवासी उपजिल्हाधिकारी तथा
सदस्य सचिव सेतू समिती, नांदेड